रविवार, २५ डिसेंबर २०२२ तरुण भारत

# सीमाभागात सहकारी चळवळीचा सेतू उभारावा

## डॉ. ज्ञानेश्वर मुळे रवळनाथ हौसिंग फायनान्सच्या १० व्या शाखेचे सांगलीत उद्घाटन

प्रतिनिधी
सांगली

देशाच्या स्वातंत्र्यांचा अमृतमहोत्सव आणि भारत जगाचा विश्वगुरू होण्याच्या मार्गावर होत असताना आपण सगळ्या देशवासियांनी एक होण्याची आणि राज्या-राज्यात आर्थिक ,सांस्कृतिक व सहकारी चळवळीचा सेतू उभारण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी विचारवंत व भाषासंस्था यांनी संवाद साधला पाहिजे. असे प्रतिपादन राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे सदस्य डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांनी येथे बोलताना केले.

आजरा (जि. कोल्हापूर) येथील रवळनाथ को ऑप मल्टीस्टेट हौसिंग फायनान्सच्या १० व्या शाखेचे सांगलीतील उत्तर शिवाजीनगरमधील कॉलेज कार्नर येथील शनिवारी उदघाटन डॉ. मुळे यांच्याहस्ते व आयकर विभागाच्या महासंचालक डॉ. साधना शंकर, सेवानिवृत्त प्रादेशिक परिवहन अधिकारी बी.आय.आजरी, सेवानिवृत्त अप्पर पोलीस अधीक्षक सुहास नाडगौंडा यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटनाचा कार्यक्रम पार पडला. दीपप्रज्ज्वलनासह गणेश व रवळनाथ यांच्या फोटोचे पूजन यावेळी करण्यात आले. यानिमित्ताने लठ्ठे शिक्षण संस्थेच्या सभागृहात मुख्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

रवळनाथ हौसिंग फायनान्स ही राष्ट्रीय पातळीवरील आदर्श संस्था असून डिजीटल युगात माणूस अदृश्य होत असताना या संस्थेने घरांना कर्जे देताना कागदपत्रे नव्हे तर त्यापाठीमागील माणूस पाहिला आहे. असे सांगून डॉ. मुळे म्हणाले, सांगली हा मोठा गुणग्राहक असणारा जिल्हा आहे. ही संस्था या जिल्ह्यात मोठी झेप घेईल. रवळनाथ संस्थेत कधीही राजकारण आले नाही. हल्ली विश्वास ही एक मोठी समस्या होवून बसली आहे. रवळनाथने परंपरांगत



सांगली : रवळनाथ हौसिंग फायनान्स सांगली शाखा उदघाटनप्रसंगी बोलताना डॉ. ज्ञानेश्वर मुळे,एम. एल. चौगुले, डॉ. साधना शंकर, बी. आय. आजरी, सुहास नाडगौंडा, दत्ता पाटील, प्राचार्य भास्कर ताम्हनकर.

व आधुनिकता या दोन्हींचा संगम घातलेला आहे. या संस्थेतील कर्जांना प्रधानमंत्री योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील आहे. असेही ते म्हणाले. डॉ. साधना शंकर, सुहास नाडगौंडा व बी. आय. आजरी यांनीही मनोगते व्यक्त केली. संस्थेच्यावतीने आकांशा गुरव, तृष्टी पाटील या विद्यार्थिनींचा सत्कार करण्यात आला. रवळनाथ हौसिंग फायनान्सचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेतला लवकरच कराड व पुणे येथे शाखा तसेच दिल्ली व गोव्यातही विस्तार होत असल्याचे सांगितले.

सांगली शाखा अध्यक्ष प्राचार्य डॉ. भास्कर ताम्हनकर यांनी उपस्थितांचे स्वागत, सतिश हेरवाडे यांनी संदेशवाचन, किरण पाटील यांनी सूत्रसंचालन तर शाखा सल्लागार प्राचार्य डॉ. आर. जी. कुलकर्णी यांनी आभार मानले. याप्रसंगी उपाध्यक्ष प्रा.व्ही.के. मायदेव, संचालक प्रा.डॉ. निळपणकर, शाखा चेअरमन प्राचार्य आनंद मेणसे बेळगाव, प्राचार्य के. एस. पाटील जयसिंगपूर, प्राचार्य डॉ.प्रकाश हेरेकर निपाणी, पुष्पा नेसरीकर, चंदगड, प्रा.विनायक आजगेकर आजरा, प्राचार्य राजाराम पाटील नेसरी, मुख्य कार्यकारी अधिकारी दतात्रय मायदेव, श्रेयस गाडवे, दतात्रय बरगे, उपाध्यक्ष बाळासाहेब हिरेमठ, मीना रिंगणे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर व नागरिक उपस्थित होते.